# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SOCIOLOGY & HUMANITIES

**ISSN 2277 – 9809 (online)**
**ISSN 2348 - 9359 (Print)**

*An Internationally Indexed Peer Reviewed & Refereed Journal*

www.IRJMSH.com
www.isarasolutions.com

Published by iSaRa Solutions

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि आरक्षण धोरण

**प्रा. डॉ. सौ. अरुणा रवींद्र वाघोले**

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख

आळे महाविद्यालय, जुन्नर, जि. पुणे

aruna.123w@gmail.com

**प्रास्ताविक :**

छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्यांना समान संधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. जाणता राजा व दलित वस्तीत जाऊन त्यांच्या लोकांत पंक्तीत जेवणारा राजा म्हणजे शाहू छत्रपती. त्यांच्या संस्थानात अस्पृश्यांना दरबारात, राजवाडयात नोकरीसाठी घेतले. राजाराम कांबळे या अस्पृश्याला कोल्हापुरात मध्यवस्तीत हॉटेल बांधून दिले. महाराज स्वतः तेथे चहा घेत असत. हरिजन तलाठी नेमले. त्यांना बढत्या दिल्या, विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह बांधले. अस्पृश्यता पाळू नये असा वटहुकूम काढला. अस्पृश्यांना शाळा, विहिरी, तलाव, दवाखाने, पानवठे खुले केले. वटहुकूम काढून सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविला. सुशिक्षित अस्पृश्य तरुणांना वकिलीच्या सनदा दिल्या. आंतरजातीय विवाह घडविले. बेरड, रामोशी, फासेपारधी यांना समाजात दर्जा देण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्य परिषदांना ते हजेरी लावत. नोकरीत ५० टक्के आरक्षण ठेवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना परदेशात जाऊन शिक्षण घेण्यासाठी मदत केली. त्यांचे कार्य आदर्श व प्रेरणादायी होते. आरक्षण धोरण राबविण्यासाठी प्रयत्न केले. कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांनी सामाजिक प्रबोधनाच्या कार्यात बराच मोठा वाटा उचलला. महाराजांच्या दरबारात वेदोक्त प्रकरण घडून आले, म्हणजेच एक ब्राम्हण पुरोहिताने महाराजांसमोर वेदातील मंत्र म्हणायला नकार दिला. या प्रसंगामुळे महाराज अंतर्मुख झाले. आणि त्यांनी सामाजिक प्रबोधनाच्या आणि सामाजिक सुधारणेच्या कार्याचा प्रारंभ करण्याचा निश्चय केला.[१] या कार्यामुळेच बहुजन समाजातील लायक उमेदवारांना त्यांनी शासनातील महत्त्वाच्या जागांवर नेमण्यास प्रारंभ केला. दलित प्रवर्गातील लायक लोकांना त्यांना काही प्रमाणात नोकऱ्या देण्यास प्रारंभ केला. रिझर्वेशन पॉलिसी खऱ्या अर्थाने अंमलात आणावयास महाराजांनी प्रारंभ केला. असे म्हटले पाहिजे. 'रामोशी आणि बेरड समाजातील लोकांना चावडीवर जाऊन रोज हजेरी द्यावी लागे, ही वाईट प्रथा महाराजांनी बंद केले अशा रीतीने शाहू महाराजांनी आपल्या राज्यात सामाजिक सुधारणा आणून कोल्हापूर राज्यात नवीन युगाला प्रारंभ केला.[२]

**बालपण व संस्कार :**

कागलच्या श्रीमंत जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे आणि मातोश्री राधाबाई साहेब यांच्या पोटी २६ जून १८७४ रोजी राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव होते. आबासाहेब घाटगे उत्तम प्रशासक म्हणून ख्यातकीर्त होते. त्यांनी आपल्या भागात प्रजाहितदक्ष कारभार चालविला होता. आपल्या मुलांना घरीच शिकविण्याची उत्तम सोय त्यांनी केली. अनुभव निष्ठ ज्ञान घेण्यास यामुळे मदत झाली. वयाच्या दहाव्या वर्षी ते कोल्हापूरच्या राजघराण्यात दत्तक गेले. १७ मार्च १८७४ रोजी यशवंतराव दत्तक गेले. आणि त्यांचे नामकरण शाहू महाराज असे झाले. ३ लाख २१ हजार ७०१ चौरस मैल संस्थानाचे ते प्रमुख झाले.

**शैक्षणिक वाटचाल :**

आबासाहेबांनी कृष्णाजी गोखले, हरिपंत गोखले आणि ब्रिटिश राजनैतिक उपप्रतिनिधी फिट झिरॉल्ड यांच्या मार्गदर्शनाखाली शाहू महाराजांना योग्य शिक्षण दिले. पुढे त्यांना राजकोटच्या राजकुमार विद्यालयात अधिक शिक्षणासाठी पाठवण्यात आले. आबासाहेबांच्या अकाली मृत्यूनंतर महाराज कोल्हापूरला परतले. याप्रसंगी त्यांनी निर्व्यसनी राहण्याची जणू शपथच घेतली. यथावकाश तत्कालीन रूढीप्रमाणे सन १८९१ मध्ये बडोद्याचे सरदार खानविलकर यांच्या कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी महाराजांचा विवाह झाला. राज्यकारभाराची सूत्रे हाती येण्यापूर्वी महाराजांनी राज्यातील सर्व तालुका ठिकाणांची पाहणी केली. जहागीरदारांच्या प्रदेशास भेटी दिल्या. गरिबांमध्ये मिसळून, शेतकऱ्यांमध्ये राहून संस्थानची पाहणी तोपर्यंत कोणी केली नव्हती.

**राज्याभिषेक सोहळा :**

२ एप्रिल १९९४ रोजी खास दरबार भरवून राज्यकारभाराची सूत्रे छत्रपतींना देण्याचा कार्यक्रम राज्यपाल लॉर्ड हॅरिस यांच्या हस्ते पार पडला. शाहू राजे अधिकृतरित्या छत्रपती झाले. छत्रपतींसमोर काटकसरीचे धोरण, निरक्षरता, सरकारी नोकऱ्यांमध्ये विषमता, भ्रष्टाचार, आर्थिक विषमता अशी अनेक आव्हाने हात जोडून समोर उभी होती.

**दलित चळवळ आणि दलितांसाठी कार्य :**

'दलित' शब्द जातीवाचक किंवा व आजचा संघर्षशील या अर्थाने काही जण वापरतात. अनेकांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्यांना दलित मानले आहे. हा शब्द सामाजिकदृष्ट्या मागास असलेल्या समाजाचे प्रतिनिधित्व करतो. हिंदू समाजाने बहिष्कृत व तिरस्कृत ठेवलेल्या जाती जमातींना दलित म्हणणे योग्य होईल. अस्पृश्य, दलित यांचा उद्धार व्हावा यासाठी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य उल्लेखनीय आहे. त्याहीपूर्वी बाळशास्त्री जांभेकरांनी दर्पण मधून यासाठी वैचारिक पार्श्वभूमी मांडलेली दिसते. महात्मा फुले यांचे कार्य आहे त्यांच्या प्रेरणेने वळसंगकरांनी व घाटगे आर.एस. यांनी दीनबंधू व सुधारक साप्ताहिकातून लेखन केले.

'विटाळ विद्वासन' हे पत्र १८८९ मध्ये प्रसिद्ध केले. वळसंगकरांनी अन्याय दोष परिहारक मंडळी ही संघटना बनवली अखंड नावाखाली कविता लिहिल्या. सामाजिक परिषद अधिवेशनात (पुणे) सवर्ण हिंदूंना दलितांसाठी विनविले. त्यांचे कार्य श्रीपतराव थोरात (अहमदनगर) शि. ज्ञा. कांबळे (पुणे), कि. फ. बनसोडे (नागपूर) यांनी चालू ठेवले. यातूनच पुढे छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्यांना समान संधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.

**छत्रपती शाहू अस्पृश्य उद्धार चळवळ :**

कोल्हापूर संस्थांचे प्रमुख राजर्षी शाहू महाराज यांनी महात्मा फुले यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्यता निवारणासाठी कार्यक्रम हाती घेतला, तसेच शाहू महाराजांनी अस्पृश्यांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. संस्थानास संस्थानात शाहू महाराजांनी अस्पृश्यांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. संस्थानात अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी शाळा उघडल्या, संस्थानातील सुशिक्षित अस्पृश्यांना दरबारी नोकरी दिल्या, संस्थानातील प्रत्येक गावात ग्रामसेवक, तलाठी म्हणून अस्पृश्य व्यक्तीच्या निवडणुका केल्या, उच्च शिक्षणासाठी शहरात वस्तीगृह स्थापन केले. त्याच्या पिण्याच्या पाण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या.[३] त्याचबरोबर अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी स्वतः गंगाराम कांबळे नावाच्या व्यक्तीस कोल्हापूर शहरात मध्य वस्तीत हॉटेल उघडून दिले. स्वतः शाहू महाराज तिथे जाऊन चहा घेत असत. जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाहसोत्तेजन दिले स्वतःच्या मुलीचा विवाह धनगर जातीत करून दिला.[४]

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र भारतात आमचे स्थान काय असेल, भवितव्य काय असेल, आमचा हक्क काय असेल, सवलती मिळतील काय, शोषण संपेल काय असे प्रश्न उपस्थित केले. अस्पृश्यतेचा प्रश्न त्यांनी स्वतंत्रपणे सोडवण्याचा प्रयत्न

केला. १९२३ मध्ये सी. के. बोलेंनी दलितांसाठी शाळा सार्वजनिक जागा, कार्यालय, दवाखाने, विहिरी, तलाव येथे प्रवेश द्यावा अशी कायदेमंडळात मागणी केली. १९२३ ला सरकारने तसा आदेश काढला. पण कार्यवाही होत नव्हती म्हणून १९२६ मध्ये बोलेंनी पुन्हा ठराव मांडला. डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेत 'कुलाबा डिस्ट्रिक्ट डिप्रेस्ड क्लास' ची सभा झाली. वीरेश्वर देवालय प्रवेशाच्या भीतीने सवर्णनी हल्ला केला. २० जण जखमी झाले. डॉ. बाबासाहेबांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाडचे चवदार तळे अस्पृश्यांना मोकळे केले. मनूस्मृती ही अस्पृश्यांना समाजात स्थान देत नाही तिचे दहन करण्यात आले. हे हिंदूंच्या सनातन वृत्ती विरोधात एक प्रतिकात्मक कृत्य होते.

प्रत्येक हिंदूला कोणत्याही हिंदू धर्मस्थळी जाण्याचा मूलभूत मानवी हक्क आहे. अमरावतीच्या अंबा मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून १९२७ मध्ये पंजाबराव देशमुख यांनी त्यांची भूमिका समजावून घेतली. नंतर हिंदुपैकी एस. एम. जोशी, म. वि. गाडगीळ, विनायकराव भुस्कुटे, बी. के. गायकवाड यांनी मदत केली. पर्वती मंदिर पुणे, काळाराम मंदिर नाशिक अस्पृश्यांना खुले करण्यात आले.

१९३० च्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हजर होते. अस्पृश्य हिताची हमी त्यांनी मिळवली. ब्रिटिश पंतप्रधानांनी जातीय निवाडा प्रसिद्ध केला. महात्मा गांधींना तो मान्य नव्हता, त्यांनी उपोषण केले. शेवटी पुणे करार होऊन स्वतंत्र अस्पृश्य मतदारसंघ रद्द झाले. कायदेमंडळात राखीव जागांची तरतूद झाली. अस्पृश्यता व दलितोद्धारार्थ गांधींनी प्रयत्न केले. आंबेडकरांनी भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्यता पाळण्यावर (कलम १७ प्रमाणे) बंदी घातली. वि. दा. सावरकरांचे अस्पृश्यांसाठीच प्रयत्न उल्लेखनीय आहेत. समांतर काळात व यानंतरही दलितोद्धार कार्य चालूच राहिले.

**इतर चळवळी, ब्राम्हणेतर चळवळ :**

महात्मा जोतिराव फुले यांनी १८४७ पासून या चळवळीचे बिजारोपण केले. हे एक जन आंदोलन होते. सत्यशोधक चळवळीने पार्श्वभूमी तयार केली. १९११ मध्ये महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात मराठा-कुणबी शेतकऱ्यांनी उठाव केला. तेथून या चळवळीची सुरुवात झाली, असे डॉ. सरदेसाई मानतात.

ब्राम्हणेतर चळवळीचे प्रमुख तीन टप्पे करण्यात आले आहेत.

१) १९१७ ते १९२२

२) १९२३ ते १९२९

३) १९३० ते १९४९

१९ व्या शतकात ब्राह्मण व ब्राम्हणेतर गटात संघर्ष सुरू झाला. गेल ऑमवेल, य. दि. फडके यांनी या चळवळीला शेतकऱ्यांवर आधारित बहुजन समाजाची चळवळ म्हटले आहे.

महात्मा फुले यांच्या नंतर शाहू महाराजांनी (१८७४ ते १९२२) ब्राम्हणेतरांची सुधारणा व दलित उद्धाराचे कार्य हाती घेतले.

**निष्कर्ष :**

छत्रपती शाहू राजांनी समाजातील जातीयता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. अंधश्रद्धा, मतभेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला. समाजातील दीनदलितांसाठी, कर्मचारी यांना न्याय मिळवून देण्याचा सदोदित प्रयत्न केला. माणूस जन्माने नाही,तर कर्माने श्रेष्ठ ठरतो हे दाखवून दिले. प्रामाणिकपणा, संस्कार, श्रमावरील निष्ठा, मतभेद दूर करण्यासाठी स्वतः उत्तम आचरण केले व इतरांनीही तसेच वागण्याचा प्रयत्न करणारा हा पहिला राजा ठरतो. आरक्षण धोरण राबवणारा तो पहिला राजर्षी ठरतो.

आज २१ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकातील सर्वच तरुणांनी गतकाळातील राजे, नेते, समाजसुधारक, संविधान लिहिणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनाचा अभ्यास केला पाहिजे.


**संदर्भ ग्रंथ व तळटीपा :**


१) आधुनिक भारताचा इतिहास (१८५७ ते १९६०) : ले. डॉ. श. गो. कोलारकर.
प्रकाशक- श्री. मंगेश प्रकाशन नागपूर, द्वितीयावृत्ती १९९८. पृ. क्र. ११३

२) आधुनिक भारताचा इतिहास (१८५७ ते १९६०) कित्ता : पृ. क्र. ११३

३) आधुनिक भारताचा इतिहास : ले. प्रा. गफुर शेख.
प्रकाशक- प्रितम पब्लिकेशन्स जळगाव, प्रथमावृत्ती. जून २०२५. पृ. क्र. १४२, १४३

४) आधुनिक भारताचा इतिहास कित्ता : पृ. क्र. १४२, १४३







## ISARA INSTITUTE OF MANAGEMENT & PROFESSIONAL STUDIES




RESEARCH GATEWAY




AROGYAM ONLINE




## PARIVARTAN PSYCHOLOGY CENTER






**भारतीय भाषा, शिक्षा, साहित्य एवं शोध**
**ISSN 2321 – 9726**
**WWW.BHARTIYASHODH.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SCIENCE & TECHNOLOGY**
**ISSN – 2250 – 1959 (0) 2348 – 9367 (P)**
**WWW.IRJMST.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF COMMERCE, ARTS AND SCIENCE**
**ISSN 2319 – 9202**
**WWW.CASIRJ.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SOCIOLOGY & HUMANITIES**
**ISSN 2277 – 9809 (0) 2348 - 9359 (P)**
**WWW.IRJMSH.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF SCIENCE ENGINEERING AND TECHNOLOGY**
**ISSN 2454-3195 (online)**

**WWW.RJSET.COM**

**INTEGRATED RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT, SCIENCE AND INNOVATION**
**ISSN 2582-5445**

**WWW.IRJMSI.COM**

**JOURNAL OF LEGAL STUDIES,POLITICS AND ECONOMICS RESEARCH**

**WWW.JLPER.COM**